# राशिभविष्य - ऑक्टोबर, २०२१.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना- प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेल्या त्या त्या जन्मनक्षत्राचा तारक मंत्र दिला आहे. कारण आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे सध्या या राशीच्या मंडळींचा स्वभाव अति चंचल, लहरी, अस्थिर, धाक-दडपण असह्य होणारा असा झाला असण्याची शक्यता दिसते. या राशीची लहान मुले तर द्वाड, खोडकर, हूड स्वभावाची झाली असण्याची शक्यता वाटते. असे असले तरी हा राहू काही प्रमाणात शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या धन व कुटुंब स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात कलह गैरसमज, , भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. त्याशिवाय आर्थिक चिंताही त्रस्त करतील. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत रवि, अस्तंगत मंगळ आणि वक्री बुध असे तीन ग्रह असून येथील वक्री बुध कन्या या स्वराशीत व स्वस्थानी असल्यामुळे अनुकुलच होईल. या षष्ठ स्थानी असलेले रवि व अस्तंगत मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत जात आहेत. असे असले तरी रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल व महिन्याच्या उत्तरार्धात तो केंद्रस्थानी जात असल्याने भाग्योदयकारकच होईल. महिन्याच्या पूर्वार्धात अस्तंगत मंगळ अनारोग्यकारक होईल व काही मंडळींना उष्णताविकाराचे आजार होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या अस्तंगत मंगळामुळे या राशीच्या विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात दोघांतील वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणांनी बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या अष्टम

स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील केतू प्रतिकुल असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना त्वचारोग, काहींना रक्तविकार तर काही मंडळींना मुख-दंत विकार अशापैकी आजार होणे संभवते. त्याशिवाय या केतूमुळे कुटुंबात वाद, भांडणे होणेही संभवते. शिवाय हा केतू अपघातकारक असून या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या दशम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो दिनांक ११ पासून मार्गी होत आहे. तसेच या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत शनीसह वक्री गुरु असून तो दिनांक १९ पासून मार्गी होत आहे. त्यामळे महिन्याच्या उत्तरार्धात शनि -गुरु हे दोन्ही ग्रह अनुकुल होतील व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक व लाभदायक होतील. तसेच हा शनि कोळसा, लोखंड व्यापार असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे कुमार्गी मित्रांपासून मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. जपा. त्याचप्रमाणे ह्या नेपच्यूनमुळे अर्थप्राप्तीत घोटाळे, नुकसान, विलंब होण्याची शक्यताही आहे. त्यामुळे काही मंडळींना गहिरे नैराश्य येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्षा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी " ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत राहू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे सतत अपमान होण्याची शक्यता आहे. जपा. त्यामुळे मनात सूडभावना उचंबळून येईल. त्याशिवाय या राहूमुळे वातविकाराचे आजार त्रस्त करतील. या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत वक्री बुध, आणि अस्तंगत मंगळ व वक्री शनि असे तीन ग्रह असून येथील रवि व अस्तंगत

मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत जात आहेत. या राशीच्या पंचम स्थानी असलेला वक्री बुध संततीपासून मनस्ताप देणारा असा सिद्ध झाल्यास संततिसुखात बाधा आणणारा व भय निर्माण करणारा असेल. महिन्याच्या पूर्वार्धात अस्तंगत मंगळ संततीचे दृष्टीने तापदायक असल्याचे अनुभवास येईल. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनारोग्यकारक होईल. रक्तविकार, हृदयविकार असणारांनी विशेष जपावे. रविमुळे महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत वरिष्ठांचा जाच, व मुलांपैकी कोणाच्या आजारपणाची चिंता त्रस्त करील. त्याशिवाय कुटुंबातील कोणा प्रिय व्यक्तीचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ राहील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत गेल्यावर तो दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. पण त्याच्यामुळे अनारोग्य होणे संभवते. या राशीच्या सप्तम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतु असे दोन ग्रह असून शुक्र वैवाहिक जीवनातील सुखास अनुकुल असला तरी केतू प्रतिकुल असल्यामुळे तो वैवाहिक जीवनातील सुखास बाधक होईल. या राशीच्या भाग्यस्थानी मकर राशीत वक्री शनि व वक्री गुरु असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व दिनांक १९ पासून मार्गी होत आहेत. भाग्यस्थानी असल्यामुळे हे दोन्ही ग्रह शुभच होतील व शनीमुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. गृरुमुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. अंगी असलेल्या सद्गुणांची प्रचिती देणारे प्रसंग येतील. काही मंडळींना प्रसिद्धी मिळू शकेल. या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थाचे व्यापार असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे सांपत्तिक अडचणी, जिवावरचे प्रसंग, बेअब्रूचे प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे. जपा. शिवाय त्याच्यामुळे अकारण शत्रुत्व निर्माण होण्याची शक्यताही असते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची उपासना व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोम सोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत रवि - अस्तंगत मंगळ -वक्री बुध असे तीन ग्रह असून महिन्याच्या उत्तरार्धात येथील रवि व अस्तंगत मंगळ हे दोन ग्रह या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत जात आहेत. संपूर्ण महिन्याच्या काळात बुध ग्रह गृहसौख्य व मित्रसुख देऊ शकेल; पण त्याच्यामुळे धननाश होणेही संभवते. जपा. महिन्याच्या संपूर्ण काळात रवि -मंगळ हे दोन्ही ग्रह सुद्धा प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. रविमुळे अनारोग्य, अपघात, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास, संततीचे आजार, नोकरीत वरिष्ठांचा जाच, प्रिय जनांपासून होणारे दूरत्व अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. जपा. मंगळामुळे सुद्धा कौटुंबिक त्रास, वाद, गैरसमज, भांडणे होणे संभवते. त्याशिवाय असमाधानकारक घटना घडण्याची शक्यताही आहे. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या मंगळामुळे संतति विषयक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या षष्ठ स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील केतू अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, उद्योग-व्यवसायात सहकार्य लाभेल. शुक्रामुळे मनापासून आवडत्या कलेत प्रगती करणे शक्य होईल; पण कलेतील प्रगती प्रदर्शित करण्यास संधीच मिळणार नाही. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि व वक्री गुरु असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व २१ रोजी मार्गी होत आहेत. येथील शनी प्रतिकुल होईल व त्यामुळे अनारोग्य, अपेक्षाभंग, असमाधानकारक घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. पण ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना महिन्याच्या उत्तरार्धात अचानक धनलाभ होण्याची शक्यता आहे. काही मंडळींना वारसाहक्काने असा अचानक धनलाभ होईल. या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधण्यास अनुकुल होईल. काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील. तसेच काहींना परदेशगमनाची संधी मिळेल. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे निश्चित असे काही घडण्याची शक्यता नाही. शिवाय त्याच्यामुळे मित्रांशी भांडणे होणे संभवते. या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत राहू असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे अर्थलाभ होऊ शकेल. काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळेल. पण त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर दुर्गा देवीची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने " श्रीदुर्गा देवी स्तोत्रा"चे पठण

करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी “ओम सोमसोमाय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र आर्द्रा आहे त्यांनी “ओम नमः शंकराय “ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी “ ओम अदितीये नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क** - या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत रवि , अस्तंगत मंगळ आणि वक्री बुध असे तीन ग्रह असून येथील रवि व अस्तंगत मंगळ हे दोन ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत जात आहेत. बुध ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे काहीही कारणाने शत्रुत्व निर्माण होणे संभवते. तसेच हितशत्रूंपासून धोका दिला जाणे संभवते. रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य चांगले राहील, वरिष्ठ तुमच्या कर्तृत्वाने प्रभावित होतील. काही मंडळींना बढती तर काहींना एखादे उच्च पद किंवा मानाचे स्थान मिळणेही संभवते. असे सर्व सुखसमाधान मिळण्याची शक्यता आहे. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा राशीत गेल्यावर प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, दुःख, कार्यदिरंगाई, कौटुंबिक त्रास सहन करावा लागेल व नैराश्य येईल. महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ ग्रह अनुकूल असला तरी फार काही देऊ शकणार नाही. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या चतुर्थ स्थानी गेल्यावर उदित होत असल्याने कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुलच होईल व गृहसौख्यात बाधा निर्माण करील. या राशीच्या पंचम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील शुक्र सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रात कार्यरत असणारांना अनुकुल , प्रगतिकारक व यशदायक होईल. केतूही शुभ संबंधात असल्यामुळे अनुकुल होईल व त्याच्यामुळे गूढ संशोधनात रस असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो दिनांक ११ पासून मार्गी होत आहे. त्याच्यामुळे या राशीचा विवाहेच्छू युवकयुवतींना विवाहयोग जुळून येण्यात अडथळे निर्माण होतील. या राशीच्या सप्तम स्थानी आलेला वक्री गुरु दिनांक २१ रोजी मार्गी होत आहे. त्याच्यामुळे महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात काही विवाहेच्छू मंडळींना विवाह योग येईल. काहींचे प्रेमसंबंध किंवा स्नेहसंबंध जुळून येतील. अर्थलाभ होणेही संभवते. या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून तो जलभय, विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका, खोल पाण्यात पोहावयास जाऊ नका. तसेच

बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो अनुकुल असला तरी वक्री असल्याने अडचणी, अडथळे सहन करूनच जे मिळेल ते स्वीकारावे लागेल. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे संतति विषयक एखादी समस्या त्रस्त करील. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी " ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी " ओम सर्पाय नमः::" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत रवि, वक्री बुध आणि मंगळ असून महिन्याच्या पूर्वार्धात हे तिन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून रवि-मंगळामुळे उष्णताविकाराचे अनारोग्य होणे संभवते. व उत्तरार्धात येथील रवि आणि मंगळ हे दोन ग्रह या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत गेल्यावर अनुकुल होतील व त्यांच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल, हातून कर्तबगारी सिद्ध होणारी घटना घडून येईल. नोकरीत वरिष्ठ तुमच्या कर्तबगारीने प्रभावित होतील व कोणास बढती, कोणाचा सन्मान होणे तर क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. महिन्याच्या संपूर्ण काळात वक्री बुध दुःखदायक होणार असला तरी तो धनदायक होण्याचीही शक्यता आहे. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून शुक्रामुळे शेतीवाडी असणारांना लाभदायक होईल. शिवाय ऐषाराम मिळेल. पण येथील केतू चिंतादायक असून त्याच्यामुळे घरात कोणाशी पटणार नाही. तसेच तो विषभयकारक असल्यामुळे बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. या राशीच्या षष्ठ स्थानी
मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व २१ पासून मार्गी होत आहेत. येथील शनि दशम या व्यवसाय स्थानास पूरक होणार असला तरी त्याच्यामुळे अनारोग्य, गैरसमजुती, भांडणे, शत्रुत्व निर्माण होणे संभवते. पण गुरु ग्रहामुळे आरोग्य सुधारेल व सुखसमाधान लाभेल. या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत नेपच्यून असून त्याच्यामुळे विविध कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण होणे संभवते. या राशीच्या

भाग्यस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल आणि त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो या राशीच्या नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. काही मंडळींना बढती, काहींना अधिकारपद मिळेल; तर क्वचित कोणाचा सन्मानही होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीविष्णूची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीविष्णुसहस्रनाम स्तोत्राचे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः" तारक मंत्राचा, आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी "ओम आर्यमे नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -मंगळ व वक्री बुध असे तीन ग्रह असून येथील रवि आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत हे तिन्ही ग्रह या महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून रवीमुळे अनारोग्य व आर्थिक चिंता, मनस्ताप, भांडणे होण्याची शक्यता आहे. मंगळ ग्रहामुळे उष्णताविकाराचे अनारोग्य, शरीरपीडा, श्रम, दगदग होणे संभवते. स्वभाव हट्टी, घमेंडखोर, होईल. आर्थिक चिंता सतत त्रस्त करतील. बुधामुळे धननाश, मित्रद्रोह होणे संभवते. त्याशिवाय कुसंगतीची बाधा होणे, मनस्थिती चंचल होणे संभवते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील शुक्रामुळे धनलाभ होईल व काही मंडळींना भूमिलाभ, काहींना प्रतिष्ठा तर क्वचित कोणास मानसन्मान प्राप्त होणे संभवते. येथील केतुमुळे कसले तरी मानसिक दुःख अस्वस्थ करील. अशा परिस्थितीत आध्यात्मिक उपासना केल्यास मनावरचा ताण कमी होईल. या राशीच्या पंचम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह असून येथील शनि दिनांक ११ पासून व गुरु दिनांक २१ पासून मार्गी होत आहे. येथील शनीमुळे स्वभाव स्वार्थी, संशयी, व्यवहारी होणे संभवते. पण हा शनि चिकाटीचा गुण देणारा असल्यामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यास उपयुक्त होईल. येथील गुरु ग्रह सर्व प्रकारे अनुकुल असून त्याच्यामुळे अर्थलाभ होईल, प्रेमसंबंध दृढ होतील, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल व सर्व सुख मिळेल.

या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे फसवणूक झाल्याचा मनस्ताप सहन करावा लागेल, काही मंडळींना उगीचच आपल्याला काही आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. काहींना काल्पनिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या अष्टम स्थानी ,मेष राशीत वक्री हर्षल असून तो अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळा . या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे प्रवासयोग येईल. श्रद्धा असेल तर दुर्गादेवीची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "दुर्गादेवी स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी " ओम सूर्याय नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा** - या राशीच्या व्ययस्थानी रवि -वक्री बुध आणि अस्तंगत मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि -मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी येत आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे तिन्ही ग्रह प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे सतत प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शारीरिक-मानसिक अनारोग्य, मनस्ताप, शरीरपीडा, मानभंग, वाद, भांडणे, आर्थिक चिंता, अपयश अशापैकी घटनांना सामोरे जावे लागेल. या राशीच्या धनस्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून केतूमुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील.पण येथील शुक्रामुळे कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, आणि धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व दिनांक २१ पासून मार्गी होत आहेत. येथील शनिमुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा येणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु ग्रह अनुकुल होईल व परिस्थितीत सुधारणा होईल. काही मंडळींचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार अपेक्षेनुसार पार पडतील. पण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला जाण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अतिशय कोमल व भावनाशील अशी होईल. पण अध्यात्मात आणि गूढ संशोधनात रस असणारांना हा नेपच्यून अनुकुल व यशदायक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते.

तसेच ज्यांचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय आहे त्यांच्या भागीदारीत संशय, गैरसमज, प्रतिकुल परिस्थिती अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे या राशीच्या काही मंडळींना अचानक धनलाभ होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीशिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील शुक्रामुळे वैवाहिक जीवनातील सुख लाभेल व अन्य सुखकारक घटना घडतील. तसेच येथील केतू अनुकुल असला तरी त्याच्यापासून वाहनधोका आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण करा. या राशीच्या तृतीय स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह असून येथील शनि दिनांक ११ पासून तर गुरु दिनांक २१ पासून मार्गी होत आहेत. शनिमुळे या राशीच्या काही मंडळींना उत्तम अशी नवी नोकरी मिळेल किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळू शकेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करण्याची शक्यता आहे. गुरूमुळे प्रवासाचे योग येतील, काही लेखकांचे लेखन ग्रंथरूपात प्रसिद्ध होईल, पण एखाद्या भावंडाकडून असह्य मनस्ताप दिला जाणे संभवते. या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे घरगुती परिस्थितीत संशय, गैरसमज अशापैकी कारणांनी गढूळ वातावरण निर्माण होणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो दशम या व्यवसायस्थानास पूरक असला तरी या राशीच्या चिकित्सक बौद्धिक व संशोधनात्मक कार्यक्षेत्र असणारांनी सतत खोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनात कापटी विचार, वाममार्ग धन मिळविण्याची तीव्र इच्छा प्रबळ होईल. त्याशिवाय त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत रवि, अस्तंगत मंगळ व वक्री बुध असे तीन ग्रह असून येथील

मंगळ आणि रवि महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी जात आहेत. लाभस्थानी असलेला वक्री बुध अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुखसमाधान लाभेल, धनलाभ व मित्रलाभ होणेही संभवते, या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याच्या पूर्वार्धातच रवि अनुकुल होणार असून त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, आर्थिक लाभ होईल, क्वचित कोणास एखादे उच्च पद मिळणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे शरीरपीडा, मानभंग होणे अशापैकी घटना घडतील जपा. महिन्याच्या पूर्वार्धात मंगळ ग्रहामुळे मैत्रीत वितुष्ट निर्माण होण्याची शक्यता आहे; पण काही मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो पूर्णपणे प्रतिकुल होईल व सतत मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्नये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ ओम इंद्राय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु -** या राशीच्या धनस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह आहेत. हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व दिनांक २१ पासून मार्गी होत आहेत. येथील शनि पूर्णपणे प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे आर्थिक संकटे त्रस्त करतील व कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता आहे. पण हळूहळू गुरु ग्रह अनुकुल होईल व महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक परिस्थितीत सुधारणा होत जाईल. कुटुंबात शुभ घटना घडतील. तसेच नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील व आर्थिक चिंताचा ताण कमी होईल. या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल. पण तो अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मनःशांती देईल. तसेच गूढ संशोधनाची ओढ असणारांना त्यांच्या संशोधन कार्यात प्रगतिकारक व यशदायक होईल. या नेपच्यूनमुळे या राशीच्या काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून तो शास्त्रीय संशोधन व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या षष्ठ

स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे हितशत्रू पराभूत होतील, पण मनात कावेबाज विचार प्रबळ होतील, इतर जातीच्या मित्रांपासून लाभ होईल, पण काही मंडळींना पोटविकार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत रवि, वक्री बुध आणि अस्तंगत मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत प्रवेश करत आहेत. त्यामुळे रवि ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात विशेष करून शासकीय नोकरदार मंडळींना अनुकुल व लाभदायक होईल. मंगळामुळे व्यावसायिकांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील, काही मंडळींना हातचे सोडून नवीन काही करण्याची ऊर्मि निर्माण होईल. नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. पण काही भाग्यवंत मंडळींना एखाद्या मौल्यवान वस्तूचा लाभ होण्याची शक्यताही आहे. या राशीच्या व्ययस्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून येथील केतूमुळे स्वभाव लहरी होणे संभवते. पण येथील शुक्रामुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व सुखसमाधान लाभेल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. . म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा ”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी “ओम निऋतये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी “ओम उदकाय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच स्वराशीत वक्री शनि असून सोबत वक्री गुरु ग्रहही आहे. हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व दिनांक २१ पासून मार्गी होत आहेत. गुरु ग्रहाची साथ असल्यामुळे शनि ग्रहाची प्रतिकुलता सुसह्य होईल. शनीमुळे अनारोग्य होणे संभवते; पण गुरूमुळे गंभीर असे काही घडणार नाही. नियोजित कार्यात अडथळे आले तरी गुरूच्या साथीमुळे ते लवकरच दूर होतील. येथील गुरु या राशीच्या बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व लेखकवर्गाला अनुकुल व यशदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात गुरु-शनि मार्गी झाल्यावर त्यांचा अनुकुल प्रभाव दिसून येईल. या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्वस्थ

राहील. कोणाशी पटणार नाही, सतत तक्रारी करत राहाल. आहे त्या परिस्थितीत सुखसमाधान लाभणार नाही. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत राहू असून तो कमिशन, दलालीवर व्यवसाय करत असणारांना लाभदायक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत रवि, वक्री बुध आणि अस्तंगत मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम या व्यवसाय स्थानी जात आहेत. भाग्यस्थानी असलेला वक्री बुध महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल होणार असून त्याच्यामुळे भांडणे होणे, नियोजित कार्यात अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे मानसिक ताण, वडील मंडळींचा विरोध, कसले तरी भय त्रस्त करील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना व व्यावसायिकांना अनुकुल व लाभदायक होईल. भाग्यस्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे.

म्हणून शक्यतो प्रवास करू नका. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या दशम स्थानी गेल्यावर स्वतंत्र व्यवसाय करत असणारांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडतील. नोकरदार मंडळींना कामाचा ताण सहन करावा लागेल. पण औषधविक्रेत्यांना हा मंगळ लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी वृश्चिक राशीत केतू असून तो अनुकुल व सुखकारक होईल श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. तसेच रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ओम विष्णवे नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ ओम वसवे नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या प्रथम स्थानी याच राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मानसिक संवेदना अति जलद होत राहतील. शिवाय मनस्थिती अतिशय कोमल होईल. अशा परिस्थितीत मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून मला. त्याच्यामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना उच्च प्रकारची बौद्धिक

शक्ती, स्मरणशक्ती व आकलनशक्ती प्राप्त होईल. व त्यामुळे आपल्या नियोजित संशोधन कार्यात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. काही मंडळींना परदेशगमनाचे योग येतील. या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत राहू असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात बाधा निर्माण करू शकेल. या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत रवि, वक्री बुध आणि अस्तंगत मंगळ . असे तीन ग्रह असून येथील रवि -मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात हे रवि -मंगळ प्रतिकुल होणार असून त्यांच्यामुळे इच्छा-आकांक्षा अपूर्ण राहतील, हाती घेतलेल्या कार्यात्त अपयश येईल, संततिसुखात बाधा येईल,उष्णताविकार बळावतील व हाडमोड होणेही संभवते. शिवाय येथील मंगळ जलभयकारक व विषभयकारक असल्याने जलप्रवास करू नका व बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. महिन्याच्या उत्तरार्धात प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप, मानहानी होण्याची शक्यता आहे. या राशीच्या दशम स्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह प्रतिकुल होणार असल्याने या राशीच्या मंडळींनी नवीन काही करण्याचा विचारही करू नये, आहे ती नोकरीच मनापासून करावी. शुक्रामुळे या राशीच्या व्यावसायिकांच्या दैनंदिन कारभारात अडचणी, अडथळे निर्माण होतील. या राशीच्या व्ययस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून त्यासोबत वक्री गुरुही आहे. हे दोन्ही ग्रह अनुक्रमे दिनांक ११ व दिनांक २१ पासून मार्गी होत आहेत येथील गुरु सामाजिक कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल होईल, अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे अध्यात्मिक प्रगती करणे व मनःशांती मिळविणे शक्य होईल. पण सोबत शनि असल्यामुळे कौटुंबिक त्रास व अपेक्षाभंग सहन करावा लागेल. शनि ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे सतत प्रतिकुल परिस्थितीशी सामना करतच वाटचाल करावी लागेल. श्रद्धा असेल तर श्रीशिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना मनःशांती देईल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीशिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा भाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या धनस्थानी मेष राशीत वक्री हर्षल असून त्याच्यामुळे स्वभाव अस्थिर, चंचल, लहरी,अविचारी असा घडणे संभवते. त्यामुळे अविचाराने खर्च होणे, विक्षिप्त आचरण घडणे, आपल्या फटकळ बोलण्याने समोरच्याचा अपमान होणे अशा घटना घडण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत राहू असून त्याच्यामुळे मनस्थिती हरहुन्नरी, उदार होते, हातून कर्तृत्व घडते; पण या राहूमुळे बंधुसुखात बाधा येण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी कन्या राशीत रवि, वक्री बुध आणि अस्तंगत मंगळ असे तीन ग्रह असून येथील रवि आणि मंगळ महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत जात आहेत. अशा स्थितीत हे तिन्ही ग्रह संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुल होणार असून बुधामुळे वाद, भांडणे होणे, दुःखदायक घटना घडणे, रविमुळे अनारोग्य होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे; इच्छाआकांक्षा अपूर्ण राहणे, मंगळामुळे वैवाहिक जीवनात वाद, कटकटी, जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्याची चिंता त्रस्त करणे, अशापैकी घटना घडण्याची शक्यता असते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी वृश्चिक राशीत शुक्र व केतू असे दोन ग्रह असून केतूमुळे "वरून कीर्तन, आतून तमाशा " अशा प्रकारचे धूर्त आचरण घडण्याची शक्यता आहे. जपा. शिवाय या केतूमुळे संततिसुखात बाधा येणेही संभवते. पण येथील शुक्रामुळे काही मंडळींना गुरुकृपा तर काही मंडळींना थोरकृपा प्राप्त होईल. सुखसमाधान व ऐषाराम लाभेल. काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि आणि वक्री गुरु असे दोन ग्रह असून ते माहियाच्या उत्तरार्धात मार्गी होत आहेत. त्यामुळे हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धातच अनुकुल व लाभदायक होतील. पण शनीमुळे संततीपैकी कोणास कसला तरी असह्य त्रास होणे संभवते. पण गुरुमुळे काही मंडळींना नवी नोकरी किंवा नवे कार्यक्षेत्र मिळू शकेल. काही मंडळींना वाहनसुख मिळेल. विवाहेच्छूपैकी काहींना विवाहयोग येईल, नवे मित्र मिळतील, इच्छाआकांक्षा पूर्ण होतील. या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत वक्री नेपच्यून असून त्याच्यामुळे मानसिक व्यग्रता निर्माण होईल व नैराश्य येईल. पण हा नेपच्यून गुप्त पोलिसखात्यात कार्यरत असणारांना उपयुक्त होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चेः पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी

**“अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.**

=====ooooo0ooooo=====